दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २१९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.९ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## अब्दुल सत्तारांचे फडणवीसांनी टोचले कान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याबद्दल अपशब्द वापरणारे राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार चांगलेच अडचणीत सापडले आहेत. अब्दुल सत्तार यांच्या या विधानावरुन राष्ट्रवादी काँग्रेस चांगलीच आक्रमक झाली आहे. राष्ट्रवादीने राज्यात अब्दुल सत्तार यांच्याविरोधात जोरदार संताप व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी अब्दुल सत्तार यांच्या मुंबई आणि औरंगाबादमधील बंगल्यावर दगडफेकही केली. तसेच या विनाधप्रकरणी मुख्यमंत्र्यांनी अब्दुल सत्तार यांची २४ तासात मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, अशी मागणीही राष्ट्रवादीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र देऊन केली आहे.

अब्दुल सत्तार यांच्या या विधानावर आता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. कुणीही महिलाबद्दल अपशब्द काढू नये. अतिशय चुकीचे आहे. आम्ही त्याचा विरोध करू, आम्हीही त्यांच्या विधानाचं समर्थन करत नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# करोडी घाटात डंपर-रिक्षाचा अपघात ; ३ विद्यार्थीनींचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

**मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणानंतरही अपघातप्रवण क्षेत्राची तीव्रता कमी करण्यात राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाचे अपयश स्पष्ट झाले असून सोमवारी सायंकाळी खेडकडून भोरकडे राख भरलेला आयवा डम्पर घेऊन निघालेल्या कशेडी घाटातील चोळई येथील उतारावर ब्रेक दाबल्यावर पलटी झाला. याचवेळी डम्परजवळून जाणाऱ्या रिक्षेवर राखेचा ढिगारा कोसळून रिक्षाचालकासह तीन डीएडच्या विद्यार्थिनींचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. हा अपघात झाल्यानंतर राज्यसरकारकडून मृतांच्या नातेवाईकांना पाच लाख रूपयांची मदत जाहिर करण्यात आल्याची माहिती रायगडचे पालकमंत्री ना.उदय सामंत यांनी ट्वीटरवरून दिली असल्याचे जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी यांनी कळविले आहे. याप्रकरणी दारू पिऊन वाहन चालवून अपघात करणाऱ्या डम्परचालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून स्थानिकांनी अपघातप्रवण क्षेत्राची तीव्रता कमी करण्यात अपयशी ठरलेल्या महामार्गाच्या सदोष बांधकामाबद्दल संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल करण्यासाठी आग्रह धरल्याची माहिती प्राप्त झाली आहे.**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ व सध्याचा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वर पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटाच्या सुरूवातीलाच चोळई गावाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अपघात प्रवण क्षेत्र अस्तित्वात असल्याने अनेक अपघात घडले आहेत. चौपदरीकरणानंतरही या अपघातप्रवण क्षेत्राची तीव्रता कमी करण्यात राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागासह सर्व यंत्रणांना अपयश आल्याने अपघातांचे सातत्य कायम राहिले आहे. सोमवारी सायंकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास खेडकडून भोरकडे राख घेऊन जाणारा आयवा डम्पर (क्र. एमएच१२ एमव्ही३७३८) चालविणारा ड्रायव्हर मधुकर तुळशीराम वाघमारे (वय-५०वर्षे, रा.वडगांव हाळ, ता.भोर, जि.पुणे) याने दारू पिऊन कशेडी घाटातून डम्पर चालविताना चोळई गावाच्या हद्दीमध्ये तीव्र वळण उतारावर डम्पर आला असता ब्रेक दाबल्याने डम्पर पलटी झाला आणि डम्परजवळून जाणाऱ्या रिक्षेला डम्परची धडक बसून काही क्षणात डम्परमधील राखेचा ढिगारा कोसळून रिक्षेला भररस्त्यामध्ये समाधी मिळाली. यावेळी डम्परचालकाने ड्रायव्हर केबिनमधून बाहेर येऊन घटनास्थळावरून पोबारा करण्यासाठी काही वाहनांकडे लिफ्टही मागितली. मात्र, अपघाताच्या आवाजाने चोळईतील ग्रामस्थ रस्त्यावर आल्याने त्याला तेथून पळून जाण्यात यश आले नाही. यावेळी डम्परमधून कोसळलेल्या राखेच्या ढिगाऱ्याखाली एक रिक्षा असल्याचे ड्रायव्हरने प्रत्यक्षदशाअना



सांगितले आणि तातडीने बचावकार्यासाठी महामार्ग मृत्युंजय दूतांसह महामार्ग पोलीस आणि पोलादपूर पोलीस ठाण्याचे कर्मचारी यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. पोलादपूर कशेडी घाटातील अपघाताची खबर वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली आणि सोशल मिडीयावरूनही याबाबत पोस्ट व्हायरल होऊ लागल्या तर दुसरीकडे डम्परमधून रिक्षेवर कोसळलेला राखेचा ढिगारा हटविण्यासाठी जेसीबी अपघातस्थळी पोहोचून तातडीने प्रयत्न सुरू झाले. यावेळी अपघातग्रस्त रिक्षा (क्र.एमएच ०६ बी.व्ही. २३१३) दिसू लागली आणि रिक्षाचालक अमाज उमर बहूर (वय ४६ वर्षे, रा.गोरेगांव, ता.माणगांव, जि.रायगड) हा रिक्षेच्या हॅण्डलवरच मृतावस्थेत असल्याचे दिसून आले. मात्र, रिक्षेच्या मागील भाग पूर्णपणे चेपून भुईसपाट झाल्याने मागील बाजूचे मृतदेह बाहेर काढण्यासाठी रिक्षा महत्प्रयासाने सरळ करावी लागली.

या मागील भागातून खेड येथे डीएडची परिक्षा देऊन परतणाऱ्या विद्यार्थिनी कुमारी हानिमा अब्दुल सलाम पोपेरे (वय २३ वर्षे, रा. नांदवी, ता.माणगांव), अलिया सिद्दीक बहूर (वय २० वर्षे, रा.गोरेगांव, ता.माणगांव) आणि नाजनीन मुकीद करबेलकर (वय २२ वर्षे, रा.वावे, ता.पोलादपूर) यांचे मृतदेह राखेच्या ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आले. सर्व मृतदेह पोलादपूर ग्रामीण रूग्णालयमध्ये नेण्यात येऊन मृतांची शवचिकित्सा व शवविच्छेदन करण्यात आले.

या अपघाताची खबर कळताच मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांनी प्रत्येक मृताच्या वारसांना ५लाख रूपये सानुग्रह मदत जाहिर केल्याचे ट्विट रायगडचे पालकमंत्री ना.उदय सामंत यांनी केले. महाडचे आ.भरत गोगावले यांनीही माजी राजिप उपाध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांच्यासह तातडीने ग्रामीण रूग्णालयामध्ये मृतांच्या आप्तपरिवाराची भेट घेतली.

## शासकीय नियम धाब्यावर बसवून पनवेल-उरण प्रांतांनी दै.रायगड नगरीच्या मुख्य संपादकांना पाठविलेल्या नोटीसीबाबत मंत्रालयात मोठी चर्चा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल उरण प्रांत हे मागील सरकारच्या एका माजी मंत्र्यांच्या वरदहस्तामुळे पनवेलसारख्या मोठ्या कुरण असलेल्या प्रांतपदी नियुक्ती झाल्यावर त्यांनी एक वर्षाच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात हेराफेरी केल्याची प्रकरणे उघड होण्यासाठी दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार यांनी मागितलेली माहिती दिली आहे.

उलट सदर माहिती दडवून अशी माहिती देता येत नाही असे पत्र पाठवून एक प्रकारचा माहितीच्या अधिकाराचा अवमान केल्याचे दिसत आहे. त्या विरोधात दै.रायगड नगरीने सातत्याने आपल्या १ ते ४ भागात पर्दाफाश केला. त्यामुळे आपल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे वेशीवर टांगली जाणार याची खात्री पटल्यामुळे पनवेल प्रांतांनी शासकीय नियम सर्व धाब्यावर बसवून आपल्या मर्जीतील एका वकीलामार्फत स्वतःच्या सहीने एक नोटीस दै.रायगड नगरीच्या मुख्य संपादकांना पाठविली आहे.

ही सर्व दै.रायगड नगरीची कात्रणे नव्या सरकारच्या हाती जाताच त्यांनी भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्र करण्याचा विडा उचललेले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याची दखल घेवून प्रांतांनी पाठविलेल्या नोटीसीला रायगडचे जिल्हाधिकारी, कोकण आयुक्त आणि महाराष्ट्राचे महसूल खाते यांची परवानगी घेतली आहे काय? असा प्रश्न उपस्थित करून पनवेल प्रांत हे हुकूमशाही वृत्तीकडे जात असल्याचा अंदाज मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना आल्यामुळे त्यांनी या नोटीसीबाबत सखोल चौकशी करणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

## महाड राष्ट्रवादीने केला अब्दुल सत्तारांचा निषेध



**दै.रायगड नगरी । महाड**

राष्ट्रवादीच्या नेत्या खा. सुप्रिया सुळे यांच्याबद्दल आक्षेपार्ह शब्द वापरणाऱ्या अब्दूल सत्तार यांचा आज महाड राष्ट्रवादीने निषेध केला. त्यांच्या प्रतिमेला जोडे मारुन आणि त्यांच्या विरोधात घोषणाबाजी करून हा निषेध करण्यात आला.

शिवाजी चौकात झालेल्या या आंदोलनाला राष्ट्रवादीचे सुभाष निकम, निलेश महाडीक, राकेश शहा, जयेश देशपांडे, मन्सूर देशमुख, काका वैष्णव या पदाधिकाऱ्यांसह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## रोटरी घनदाट जंगल प्रकल्पासाठी ठाकूर कुटूंबियांचे योगदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरी घनदाट जंगल प्रकल्प अंतर्गत दोन हजार रुपये देणगी मूल्य देऊन आपल्या स्वतःच्या नावाने नावाने किंवा आप्तस्वकीयांच्या नावाने स्मृतीप्रित्यर्थ वृक्षारोपण अभियान आयोजित करण्यात आले. त्या अभियानात दानशूर ठाकूर कुटुंबीयांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन आपले आर्थिक योगदानही दिले आहे.



रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने रोटरी घनदाट जंगल प्रकल्प उभारून वनीकरणाला चालना देण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा प्रारंभ रविवारी शहरातील लक्ष्मी आय चॅरिटेबल हॉस्पिटल शेजारील नियोजित जागी मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रकल्पासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी १० लाख रुपये, आमदार प्रशांत ठाकूर यांनी आमदार निधीतून १२ लाख रुपये आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी ०५ लाख रुपये दिले असून त्याबद्दल रोटरी परिवाराकडून त्यांचे आभार मानण्यात आले.

या कार्यक्रमास माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, 'रोटरी'चे माजी गव्हर्नर व मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, प्रवीण पाटील, नरेश ठाकूर, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, माजी नगरसेविका चारुशीला घरत, हेमलता म्हात्रे, विद्या गायकवाड, ज्येष्ठ कार्यकर्ते अजय कांडपिळे, रामदास शेवाळे, अर्चना ठाकूर, सुहासिनी केकाणे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी पं. स. सदस्य .../२

## पनवेल महापालिकेचा मनमानी कारभार

### इमारत धोकादायक जाहीर करून तळमजल्यावरील खोली तोडली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील गोडसे आळीमधील लालजी केशवजी चाळ महापालिकेने कित्येक वर्षापूर्वी धोकादायक इमारत जाहीर केली आहे. या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील तीन खोल्या अस्तित्वात असताना या इमारतीतील तळमजल्यावरील मधोमध असलेली खोली महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी तोडण्याचा प्रयत्न केला.

पनवेलमधील ज्येष्ठ पत्रकार घनःश्याम मानकामे हे खोलीत १९६० पासून गेली ६२ वर्षे भाडेकरू म्हणून राहत आहेत. त्यांना याची माहिती मिळताच त्यांनी कर्मचाऱ्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी महापालिकेचे अधिकारी व अतिक्रमण विभागाचे अधिकारी यांच्या आदेशावरुन ही कारवाई सुरू असल्याचे सांगितले. घनःश्याम मानकामे यांनी याबाबत अतिक्रमण विभाचे अधिकारी यांना भेटून कारवाई थांबविण्यास सांगितले असता त्यांनी सुरूवातीला अरेरावीची भाषा सुरू केली. याबाबत एका संपादकाने त्यांना फोनवर विचारले असता त्यांनी महापालिकेचे अधिकारी यांच्या आदेशावरुन ही आपण कारवाई केली असल्याचे सांगितले. सर्व इमारत धोकादायक जाहीर केली असताना तळमजल्यावर मधोमध असलेली खोली तोडण्याचे कृत्य घर मालकाच्या सांगण्यावरुन केल्याचे या प्रकरणात दिसत असल्याचे घनःश्याम मानकामे यांनी सांगितले. या कारवाईमध्ये मानकामे यांच्या या खोलीची भिंत अर्धी तोडण्यात आल्यामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. याबाबत ते लवकरच वरिष्ठ पातळीवर दाद मागणार असल्याचे समजते.



## रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून चोरी करणाऱ्या लुटारूंना उरण पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**दै.रायगड नगरी । उरण**

द्रोणागिरी नोड येथील सेक्टर ५० मधिल एम गोल्ड ज्वेलर्स मध्ये अग्निशस्त्रासारखे दिसणारे रिवाल्वर घेऊन जबरी चोरी करण्याच्या इरादयाने दुकानात शिरलेल्या व दुकानातील सायरन वाजल्या नंतर पोबारा करणाऱ्या लुटारुना बेड्या ठोकण्यास उरण पोलिसांना यश आल्याची माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांनी दिली आहे.



पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांच्या कडून मिळालेल्या माहितीनुसार दिपावलीच्या धनत्रयोदशी दिवशी ( दि२२) द्रोणागिरी नोड येथील एम गोल्ड ज्वेलर्स मध्ये एक अज्ञात चोरटा आपल्या हातात अग्निशास्त्रसारखे दिसणारे रिवाल्वर घेऊन शिरला होता.सदर अज्ञात इसम दुकानात काम करणा-या मुलीस '' चुप बैठ,चुप बैठ' असे बोलल्याने दुकानात हजर असलेल्या दुकान मालकाने सायरन वाजविल्याने दुकानात जबरी चोरीच्या इरादयाने घुसलेला इसम घाबरून दुकानातून बाहेर निघून दुकानाबाहेर असलेल्या इनोवा कारमध्ये बसून पळून गेल्याची घटना घडली होती.सदर घटनेसंदर्भात उरण पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. २९९/२०२२ भादंवि कलम ३९८ अन्वये दिनांक २२/१०/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयाचे तपासकामी पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह ,पोलीस आयुक्त,. डॉ. जय जाधव, सह पोलीस आयुक्त परिमंडळ २ चे उप आयुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी क्षीरसागर सो,सहाय्यक पोलीस आयुक्त,तसेच उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाण्याचे गुन्हे विभागाचे अधिकारी सुहास चव्हाण, सपोनि विजय पवार, सपोनि प्रकाश पवार, पोलीस उप निरीक्षक चंद्रहार पाटील नेम. उरण पोलीस ठाणे, .../२

## कोलाड नाका येथे रायगड प्रेस क्लबतर्फे मानवी साखळी आंदोलन

**दै.रायगड नगरी । रोहा**

मुंबई गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणास झालेला विलंब आणि यामार्गाच्या झालेल्या दुरावस्थेच्या निषेधार्थ रायगड जिल्हा प्रेस क्लब तर्फे कोलाड नाका येथे आज ९ नोव्हें. ला सकाळी १०.३० वाजता मानवी साखळी आंदोलन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील पत्रकार चौपदरीकरण मागणीसाठी रस्त्यावर उतरणार असून यावेळी रास्ता वाहतुकीला कोणताही स्वरूपाचा अडथळा निर्माण न करता हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर यांनी दिली आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरू होऊन ११ वर्षे झाली मात्र अद्याप हे काम रखडलेले आहे, ते काम कधी पुर्ण होईल याचा पत्ताच नाही. या मार्गावर मोठमोठे खड्डे पडलेले असून परिणामी

होणाऱ्या अपघातांमुळे शेकडो निष्पाप लोकांना आपले प्राण गमवावे लागले तर हजारो प्रवासी त्यामध्ये जखमी झाले आहेत. मागील ९ महिन्यात रायगड जिल्हा पोलीस दूरक्षेत्राच्या .../२



# पाली डम्पिंग ग्राऊंड समस्यांच्या गर्तेत,कचरा रस्त्यावर ; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली शहरातील कित्येक टन कचरा येथील टेंबी वसाहती जवळील डम्पिंग ग्राऊंड मध्ये टाकला जातो. मात्र संरक्षक भिंत नसल्याने हा कचरा मुख्य रस्त्यावर येऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय इतरही अनेक समस्यांनी डम्पिंग ग्राऊंडला घेरले आहे.

डम्पिंग ग्राऊंडच्या आजूबाजूला शिक्षक व इतर वसाहती आहेत. आयटीआय व विद्युत महावितरण सबस्टेशन आहे. शिवाय गृहसंकुल इमारती सुद्धा आहेत. मढाळी व शिळोशी गावांना जाण्याचा हा मुख्य रस्ता आहे. त्यामुळे रस्त्यालगत असलेल्या डंपिंग ग्राऊंडवरील कचरा पूर्णपणे रस्त्यावर आल्याने व डंपिंग ग्राऊंडला संरक्षण भिंत नसल्याने घाण व दुर्गंधीमुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय तेथून जाणाऱ्या नागरिकांना नाकदाबून येजा करावी लागत आहे. फेब्रुवारी महिन्यात पाली ग्रामपंचायतीची नगरपंचायत झाली, मात्र अजूनही घनकचरा व्यवस्थापनचा प्रश्न अद्याप काही सुटला नाही. डंपिंग ग्राऊंडवर असलेल्या कचऱ्यामध्ये अधिक प्रमाणात प्लॅस्टिकयुक्त कचरा असतो.

डंपिंग ग्राऊंडला संरक्षण भिंत नसल्याने मोकाट गुरे, कुत्रे तेथे येऊन प्लास्टिक मधील अन्नपदार्थ कचऱ्यासह खातात त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येत असून अनेक जनावरे देखील दगावली आहेत. याबरोबरच येथील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणतीच शास्त्रीय पद्धत नाही. हा कचरा थेट जाळला जातो. त्यामुळे मोठया प्रमाणात वायु प्रदूषण होऊन पर्यावरण व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# कोरोना पूर्वी ज्या एक्सप्रेस गाड्यांना कर्जतला थांबा होता तो द्या, अन्यथा रेल रोको

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रेल्वे स्थानक हे मुंबई – पुणे दरम्यानचे अगदी मधे असलेले महत्वाचे साधन आहे. या स्थानकावर कोरोना संकटापूर्वी मुंबईकडे जाणाऱ्या एक्सप्रेस गाड्या थांबायच्या मात्र कोरोना संकटात त्यांचा थांबा रद्द करण्यात आला होता. आता कोरोनाचे संकट गेले आहे. जनजीवन सुरळीत झाले आहे परंतु पूर्वी असलेल्या एक्सप्रेस गाड्यांचे थांबे अजूनही रद्द असल्याने पुण्याहून कर्जतला येणाऱ्या प्रवाशांची गैरसोय होते. तसेच आर्थिक भुर्दंड पडून वेळेचही अपव्यय होत असल्याने स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष उत्तम जाधव यांनी त्या एक्सप्रेस गाड्यांचे थांबे पूर्ववत करा अन्यथा रेल रोको करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

मुंबईहून पुण्याकडे जाताना एक्सप्रेस गाड्या डबल इंजिन लावण्यासाठी कर्जत रेल्वे स्थानकावर थांबतात हा अधिकृत थांबा नसून तांत्रिक कारणासाठी थांबा आहे. गाडी थांबणार असल्याचे माहीत असल्याने प्रवासी येथे उतरतात परंतु त्यांना येथून आरक्षण मिळत नाही. कोरोना महामारीचे संकट येण्यापूर्वी बहुतांश एक्सप्रेस गाड्यांची आरक्षित तिकिटे कर्जत स्थानकावरून मिळत असत. कोरोना संकटात थांबे रद्द केल्याने आरक्षित तिकिटे सुद्धा दिली जात नाहीत. त्यामुळे कल्याण किंवा मुंबईहून आरक्षण करावे लागते. व तेथे जाऊन गाडी पकडावी लागते. त्यामुळे प्रवाशांचा वेळ व पैसे वाया जातात. तसेच पुण्याहून मुंबईला येताना कोरोना संकटापूर्वी एक्सप्रेस गाड्या थांबत असत मात्र आता त्या थांबत नसल्याने कर्जतच्या प्रवाशांना कल्याण किंवा मुंबई पर्यंत जावे लागते व परत कर्जतला यावे लागते. यामध्ये आर्थिक भुर्दंड बसतोच शिवाय वेळ वाया जातो.

स्वभिमानी रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष उत्तम जाधव यांनी कोरोना महामारी पूर्वी थांबा असलेल्या कोयना एक्सप्रेस, हैद्राबाद एक्सप्रेस, सिद्धेश्वर एक्सप्रेस, साई शिर्डी या एक्सप्रेस गाड्यांचा थांबा पूर्ववत करावा. तसेच सह्याद्री, कर्जत – पुणे पॅसेंजर आदी गाड्या बंद आहेत. त्या सुरू कराव्यात अन्यथा रेल रोको करण्यात येईल. असा इशारा त्यांनी मध्य रेल्वे प्रशासनाला दिला आहे.

# पनवेल रेल्वे स्टेशन येथे आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन फलाट क्रमांक एक येथे एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत . सदर इसमाचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे ,अंगाने सडपातळ , रंग सावळा ,डोक्याचे केस काळे व अर्धवट टक्कल असलेले , दाडी मिशी बारीक वाढलेली असून अंगात चॉकलेटी रंगाची बर्मुडा व हाफ बायाचा काळा टी शर्ट घातलेला आहे .

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी १) श्री.गोपीनाथ रामा ठाकूर, २) श्री.अशोक कृष्णा ठाकूर, ३) श्री.सचिन कृष्णा ठाकूर, आणि ४) श्रीमती.विजया कृष्णा घरत, सर्व रा.मु.पो.वशेणी, ता.उरण, जि.रायगड यांच्या मालकी वहिवाटीच्या मौजे : वशेणी, ता.उरण, येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेल्या जमीन मिळकती आहेत.

**जमीन मळकतीचे वर्णन**
**मौजे : वशेणी, ता.उरण, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकुण क्षेत्र पोटखराब्यासह हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ६२ | ७ | ०–१५.४० | ३–२५ |

वर नमूद केलेल्या मिळकत व इतर मिळकतींमधील सर्व मालकी हक्कांसहीत सदर मिळकतींचे मालक १) श्री.गोपीनाथ रामा ठाकूर, २) श्री.अशोक कृष्णा ठाकूर, ३) श्री.सचिन कृष्णा ठाकूर, आणि ४) श्रीमती.विजया कृष्णा घरत, यांच्याकडून आमचे अशिल १) श्रीमती. सीमा शैलेश चौरासिया आणि २) श्री.संतोष वरळीकर रा.५८ जी.बी., समजे हाऊस, सोनापूर वरळी गाव, मुंबई यांनी कायमस्वरुपी खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण–दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क–हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकविस दिवसांचे आत आमच्या वरीलप्रमाणेच्या कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील १) श्री.गोपीनाथ रामा ठाकूर, २) श्री.अशोक कृष्णा ठाकूर, ३) श्री.सचिन कृष्णा ठाकूर आणि ४) श्रीमती.विजया कृष्णा घरत, यांचे मालकी हक्क–हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकती खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.०८/११/२०२२

सही/–
**ॲड.श्री.विशाल अनंत मुंडकर**
**शॉप क्र.२, पवन को.ऑप.हौसिंग सोसायटी, कै.रत्नाकर खरे मार्ग, नवीन सेशन कोर्टासमोर, पनवेल–४१०२०६, जि.रायगड**
**मो.नं.९२२१७७७६०४/९८७०७३९००३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल सौ.वैशाली विष्णू म्हात्रे, रा.रो हाऊस नं.२३, प्लॉट नं.५३६, साकेत को.हौ.सोसायटी, एच.ओ.सी.कॉलनी, ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीच्या खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे जुने मुळ (Original) दस्त म्हणजेच परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती बाबतचे दि.२९/०३/२००७ रोजीचे नोंदणीकृत विक्रीचा करारनामा (Agreement to Sale) (पवल–१, दस्त नं.२६१९/२००७) ची मुळप्रत आमच्या अशिलांकडून गहाळ झालेली आहे. त्याबाबत त्यांनी पनवेल शहर पोलीस स्टेशन ता.पनवेल, जि.रायगड येथे लॉस्ट प्रॉपर्टी रजिस्ट्रेशन नं.२२१८/२०२२ दि.०४/११/२०२२ प्रमाणे तक्रार नोंदविलेली आहे.

तरी सदर गहाळ झालेल्या दस्ताची मुळ प्रत कोणालाही सापडली असल्यास, अथवा सापडल्यास संबंधित व्यक्तीने सदरचा दस्त आमच्या खालील कार्यालयाच्या पत्यावर ७ दिवसांच्या आत आणून द्यावी अथवा त्याबाबत कळवावे. सदरच्या गहाळ झालेल्या दस्ताने कोणत्याही व्यक्तीस परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणतेही हक्क निर्माण होणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**रो हाऊस नं.२३, प्लॉट नं.५३६, साकेत को.हौ.सोसायटी, एच.ओ.सी.कॉलनी, ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ क्षेत्रफळ ११९ चौ.मी. (५९.५ चौ.मी. निवासी बांधकाम)**

पनवेल
दि.०८/११/२०२२

सही/–
**ॲड.दर्शन प्र.पाठारे**
**बी–१४, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, रतन टॉकीज समोर, टिळक रोड, पनवेल–४१०२०६**
**मो.नं.८२८६६६२९२३३**

# त्रिपुरारी पौर्णिमेला रंगला सामाजिक रांगोळी उत्सव

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील ग्रामदेवता चिंचबादेवी मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त श्री चिंचबादेवी देवस्थान ट्रस्ट व आई माऊली युवा प्रतिष्ठान यांच्या सयुक्त विद्यमाने यावेळी दिव्यांची रोषणाई सोबत राज्यस्तरीय सामाजिक रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

श्री चिंचबादेवी मंदिर हे बोर्लीपंचतन पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे श्रध्दास्थान असून दरवर्षी त्रिपुरारी पौर्णिमेच्या निमित्ताने येथील सर्व भक्तजन या कार्यक्रमाचा आस्वाद घेत असतात. यावेळी मंदिरामध्ये सामाजिक रांगोळी स्पर्धा विषयातून नवीन दृष्टी देणारं उपक्रम राबविण्यात आला. विशेषतः या स्पर्धेला राज्यातील प्रसिद्ध रांगोळीकार २८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. श्री चिंचबादेवी देवस्थांनच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दिव्यांच्या रोषणाई सोबतच रांगोळी स्पर्धा उत्सुकतेच्या ठरल्या.

**GANGASAGAR CO-OP.HOUSING SOCIETY LTD**
Regd. No.TNA/(TNA)/HSG/(TC)/457/1985-86 Dt 27/02/1986
Address : Plot No.41, Sector-14, Vashi, Navi Mumbai 400703

## जाहीर नोटीस

जाहीर नोटीस देण्यात येते की, डॉ.श्री.प्रशांत विठ्ठलराव जाधव हे घर नं.११, गंगासागर को.ऑप.हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.४१, सेक्टर–१४, वाशी, नवी मुंबई–४००७०३ चे संस्थापक सदस्य आहे. त्या सोसायटीतील फ्लॅट नं.११ चे ते मालक असून सोसायटीने त्यांना शेअर सर्टीफिकेट दिले होते. मात्र ते चोरी झाल्याबाबत त्यांनी सातारा पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल करून या सोसायटीकडे ड्युप्लिकेट शेअर सर्टीफिकेट देण्याबाबत विनंती अर्ज केला आहे.

तरी सदरचे शेअर सर्टीफिकेट देण्याबाबत कोणाला काही हरकत असल्यास त्यांनी या सोसायटीला १५ दिवसात हरकत नोंदवावी.

दि.७/११/२०२२
ठिकाण : वाशी

सही/–
**एस.डी.मनवार**
**अध्यक्ष**
**घर नं.१७, गंगासागर सोसायटी, प्लॉट नं.४१, सेक्टर–१४, वाशी, नवी मुंबई–४००७०३**

**GANGASAGAR CO-OP.HOUSING SOCIETY LTD**
Regd. No.TNA/(TNA)/HSG/(TC)/457/1985-86 Dt 27/02/1986
Address : Plot No.41, Sector-14, Vashi, Navi Mumbai 400703

## जाहीर नोटीस

जाहीर नोटीस देण्यात येते की, श्री.विठ्ठल न.बिराजदार हे घर नं.८, गंगासागर को.ऑप.हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.४१, सेक्टर–१४, वाशी, नवी मुंबई–४००७०३ चे संस्थापक सदस्य आहे. त्या सोसायटीतील फ्लॅट नं.८ चे ते मालक असून सोसायटीने त्यांना शेअर सर्टीफिकेट दिले होते. मात्र ते घर शिफ्टींग करतेवेळी हरवले म्हणून त्यांनी वाशी पोलीस स्टेशनमध्ये ऑनलाईन एफ.आय.आर.दाखल करून या सोसायटीकडे ड्युप्लिकेट शेअर सर्टीफिकेट देण्याबाबत विनंती अर्ज केला आहे.

तरी सदरचे शेअर सर्टीफिकेट देण्याबाबत कोणाला काही हरकत असल्यास त्यांनी या सोसायटीला १५ दिवसात हरकत नोंदवावी.

दि.७/११/२०२२
ठिकाण : वाशी

सही/–
**एस.डी.मनवार**
**अध्यक्ष**
**घर नं.१७, गंगासागर सोसायटी, प्लॉट नं.४१, सेक्टर–१४, वाशी, नवी मुंबई–४००७०३**

## जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की, खालील भूखंडाचे मालक १) श्री.धर्मा चंदर पाटील व २) श्री.नरेश गणपत पाटील यांच्या नावे सिडकोकडून प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधील संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधील स्थलांतरित होणाऱ्या निवासी वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी निवासी वापराकरिता भूखंड क्र.२१६, सेक्टर–२५, क्षेत्र ४०.०० चौ.मी. नोड : पुष्पक (वहाळ), ता.पनवेल, जि.रायगड या वर्णनाचा भूखंड वितरित झालेला आहे. सदर भूखंड माझ्या अशिल सौ. सानवी सुशिल राऊत, पत्ता : घर नं.१९०, मु.कळंबुसरे, पो.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांच्या नावे खरेदी विक्रीच्या करारनाम्याद्वारे / त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे कायमस्वरुपी हस्तांतरण करीत आहेत.

| नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २६ | २१६ | ४०.०० चौ.मी. |

तरी कोणीही व्यक्ती / व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे सदर भूखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी, कंपनी बक्षिस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत या भूखंडाच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयीन पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भूखंडाच्या त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती / तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दि.८/११/२०२२

सही/–
**ॲड.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, से.१ ए, प्रभात सेंटर, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई–४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## रोटरी घनदाट जंगल प्रकल्पासाठी ठाकूर कुटूंबियांचे योगदान

भूपेंद्र पाटील, करंजाडेचे माजी सरपंच बळीराम म्हात्रे, सुरेंद्र पाटील, प्रदीप भगत, शिवाजी दुर्गे, गुरूनाथ म्हात्रे, कुणाल घरत यांच्यासह 'रोटरी'चे प्रांतपाल डॉ. अनिल परमार, डॉ. गुणे मॅडम, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील, सचिव अनिल ठकेकर, प्रोजेक्ट चेअरमन सुदीप गायकवाड, डॉ. अभय गुरसळे, डॉ. आवटे, वेलणकर, दीपक गडगे, भगवान पाटील, सुनील गाडगीळ, ऋषिकेश बुवा, आतिष थोरात, शैलेश पोटे, सैतावडेकर, वारंगे, प्रीतम कैया, विक्रम कैया, डॉ. मिलिंद घरत, जे. डी. तांडेल, घोडींदे, ऋषिकेश जोशी, डॉ. तुषार जोशी व इतर सदस्य होते.

## उरण पोलिसांनी ठोकल्या बेड्या

सपोनि गळवे, पनवेल तालुका पोलीस ठाणे, सपोनि निकम, न्हावाशेवा पोलीस ठाणे तसेच पोहवा/३५१८ अधिकारी, पोहवा/९७६ रूपेश पाटील, पोहवा/२०१३ घनश्याम पाटील, पोहवा/१७४४ शशिकांत घरत, पोहवा/९४४ नितीन गायकवाड, पोना/१५७६ मच्छिंद्र कोळी, पोशि/३०४८ सचिन माळशिकारे सर्व नेम. उरण पोलिस ठाणे यांनी कोणताही सुगावा नसताना आरोपीत हे घटनास्थळावर येण्याचा व जाण्याचा मार्ग निश्चित करून सदर मार्गावरील सीसीटीव्ही फूटेजची पाहणी करून एम गोल्ड ज्वेलर्समध्ये जबरी चोरीच्या इरादयाने अग्निशस्त्रासारखे दिसणारे रिव्हॉल्व्हर घेऊन आलेला इसम ज्या इनोवा कारमधून पळून गेला होता त्या इनोवा कारचा नंबर एम एच ४३ एक्स ७०७७ असा नंबर असल्याचे दिसून आले.

सदर गाडीचे फास्टटॅगला संलग्न असलेल्या मोबाईल नंबरवरून गाडी मालकाची माहिती प्राप्त करून गाडी मालकाकडे दिनाक २२/१०/२०२२ रोजी गाडी कोणास दिली होती याबाबत माहिती घेतली. तेव्हा सदरची इनोवा कार चालक नामे अंकुश अश्रुबा जाधव, वय ४४ वर्षे, व्यवसाय–चालक, रा. ९ नंबर बिल्डींगच्या समोरील चाळ, बुध्द मंदिराचे बाजुला, संघर्षनगर, साकीनाका, मुंबई नं.४०००७२ हा कल्याण अलिबाग भाडे असल्याचे सांगून गेला होता. चालक नामे अंकुश अश्रुबा जाधव यास दिनांक ३०/१०/२०२२ रोजी सानपाडा, नवी मुंबई येथून ताब्यात घेऊन त्याचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने चैकशी केली असता त्याने पाहिजे आरोपी एजाज अब्दुल करीम चैधरी, रा. उल्हासनगर कॅम्प नं. ४ याचे सांगणेवरून इनोवा गाडी भाडयाने घेतली होती.

त्यानंतर दिनांक २२/१०/२०२२ रोजी पहाटे ७–३० वा. चे सुमारास घटनास्थळी मॅजेस्टिक व्हीला येथे येऊन एम गोल्ड ज्वेलर्समध्ये जबरी चोरी करण्याचे इराद्याने अटक आरोपी घटनास्थळी आले असल्याचे सांगितले. सदर गुन्हयात आरोपीत नामे १) अंकुश अश्रुबा जाधव, वय ४४ वर्षे, व्यवसाय–चालक, रा. ९ नंबर बिल्डींगच्या समोरील चाळ, बुध्द मंदिराचे बाजुला, संघर्ष नगर, साकीनाका, मुंबई नं.४०००७२, २) बिलाल अब्दुल करीम चैधरी, वय १९ वर्षे, रा.मनिष भाटीया यांची चाळ, रूम नं. २, काळूच्या दुकानाच्या मागे, सेक्शन नं.२७, उल्हासनगर नं. ४, ता. उल्हासनगर, जि.ठाणे आरोपी क्र. १व २ यांना दिनांक ३१/१०/२०२२ रोजी १८–०५ वाजता अटक केली असुन मा. न्यायालयाने दिनांक ८/११/२०२२ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे. ३) शंकर बनारसी चैरासिया, वय ५१वर्षे, व्यवसाय–इस्टेट एजंट, रा. रुम नं. २६३, संगमनगर, चिखलवाडी, सॉल्ट पेन रोड, कंचन स्टोअर्सजवळ, वडाळा (पुर्व), ॲन्टापहिल, मुंबई नं.३७ यास दिनांक ४/११/२०२२ रोजी १८–३० वा.अटक करणेत आली असून दिनांक ८/११/२०२२पर्यत मा. न्यायालयाने पोलीस कस्टडी रिमांड दिली आहे.पोलीसांनी ताब्यात घेतल्या आरोपींवर विविध ठिकाणी गुन्हे दाखल असल्याने पोलीस सदर आरोपींची सखोल चौकशी करत असुन गुन्ह्यांसाठी वापरण्यात आलेली इनोवा गाडी व आरोपींजवळील रोख रक्कम ताब्यात घेण्यात आली आहे.

## कोलाड नाका येथे रायगड प्रेस क्लबतर्फे मानवी साखळी आंदोलन

हद्दीत येणाऱ्या महामार्गावरील भागात १४५ अपघात झाले असून यामध्ये ४९ जणांचा मृत्यू तर १६० जण जखमी झाले आहेत. मुंबई गोवा महामार्गावर सरकार अजून किती रक्ताचे सडे आणि मृत्यूंचा तांडव पाहणार आहे, १२ वर्षे झाली ना चौपदरीकरण झाले, ना रस्त्यावरील खड्डे भरले गेले. त्यामुळे मुंबई –गोवा महामार्ग पुन्हा मृत्यूचा सापळा बनला, सत्ताधारी आणि विरोधक दोघांनी यामार्गाच्या कामाकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले, सरकार मध्ये असले की या प्रश्नाकडे दुर्लक्ष करायचे आणि सत्तेबाहेर आले की रस्त्यासाठी आवाज उठवायचे यापलीकडे राजकिय पक्षांनी काहीही केले नसल्याची रायगड मधिल जनतेची भावना आहे. निर्दयी सरकारच्या नाकर्तेपणामुळे प्रवाशांचा जीव टांगणीला लागलेला असल्याने जनतेच्या मनात रोष आहे.

रायगड जिल्हा प्रेस क्लबने अनेक वेळा मोर्चे, आंदोलन, रस्ता रोको, शासनाकडे पत्रव्यवहार आदी मार्गाने या रस्त्याच्या प्रश्नासाठी आंदोलन केलेले आहे. शासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने दि. ९ नोव्हें. रोजी सकाळी १०.३० वाजता मुंबई–गोवा महामार्गावरील कोलाड येथे मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त ज्येष्ठ पत्रकार एस.एम. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी साखळी आंदोलन करण्यात येणार असून रायगडमधील विविध सामाजिक संघटना, संस्था, शेकडो पत्रकार उपस्थित राहाणार असल्याची माहिती रायगड जिल्हा प्रेस क्लबने दिली आहे.

अर्जदार तर्फे वकील : अनंत देवजी पाटील

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्याया.सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम नं.७२/२०१८
नि.नं.१६/ड
ने.ता.५/१२/२०२२

अरुण लक्ष्मण पाटील — अर्जदार
विरुद्ध
१) संतोष बाबुराव मोहिते
२) दि न्यू इंडिया इश्युरन्स कं.लि. — सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं.१ — संतोष बाबुराव मोहिते
प्लॉट नं.३९/३४, गोखले हायस्कूल जवळ,
सेक्टर–१२, खारघर, पनवेल
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०३

दि.०५/०२/२०१८ रोजी पहाटे ०५:१५ वाजण्याच्या सुमारास मौजे : पनवेल हद्दीत, जुना–मुंबई–पुणे हायवेवरील, पळस्पे फाट्याचे जवळ, टाटा मोटार सर्व्हिस सेंटरच्या समोर, पुणे लेनवर, पनवेल शहर पोलीस स्टेशन, नवी मुंबई, जि.रायगड यांचे हद्दीत सदरचा अपघात घडला. सदर अपघातामध्ये अरुण लक्ष्मण पाटील हे गंभीररित्या जखमी झाले आहेत. ट्रेलर बॉडी क्र.एम.एच.४६/बी बी ३९९१ चालक हा अरुण लक्ष्मण पाटील यांच्या जखमांस कारणीभूत ठरला आहे. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता रु.९,००,०००/– चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी न्यायालयात दि.५/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावी. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज दि.४/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/– क.लिपीक जिल्हा न्याया., अलिबाग | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक जिल्हा न्याया., अलिबाग |
|---|---|---|

मा.इंदलकर साहेब यांच्या कोर्टात
अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात
फौ.चौ.अर्ज १२३२/२०२२
ने.ता.२७/१२/२०२२

सौ.मिरादेवी हरीप्रसाद वाल्मिकी
वय : ५५, व्यवसाय : नोकरी
रा.रुम नं.१०, निल संकल्प को.ऑप.हौसिंग सोसायटी, सेक्टर–७, खांदा कॉलनी, पनवेल
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल विभाग
जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै.हरिप्रसाद टिकारामा वाल्मिकी यांचा मृत्यू दि.०४/०७/२०२० रोजी राहत्या घरी रुम नं.१० निल संकल्प को.ऑप.हौसिंग सोसायटी, सेक्टर–७, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झाला होता.

अर्जदार यांचे पती कै.हरिप्रसाद टिकारामा वाल्मिकी यांची मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कै.हरिप्रसाद टिकारामा वाल्मिकी या वर नमूद ठिकाणी मृत्यू झाले आहे या संदर्भात कोणालाही काही सांगावयाचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि. रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/– क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

मा.पांडे साहेब यांच्या कोर्टात
अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या न्यायालयात
फौ.चौ.अर्ज १२५७/२०२२
ने.ता.१२/१२/२०२२

श्री.सखाराम रघुनाथ पाटील
वय : ५२, व्यवसाय :
रा.मु.पोस्ट घर नं.१३९, सेक्टर १४
कामोठे गाव, ता.पनवेल, जि.रायगड
विरुद्ध
कामोठे विभाग
जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.मथीबाई रघुनाथ पाटील यांचा मृत्यू दि.१४/०७/२००१ रोजी राहत्या घरी मु.पोस्ट घर नं.१३९, सेक्टर १४, कामोठे गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झाला आहे.

अर्जदार यांची आई कै.मथीबाई रघुनाथ पाटील यांची मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कै.मथीबाई रघुनाथ पाटील या वर नमूद ठिकाणी मृत्यू झाले आहे या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य आदेश करेल.

आज दि. रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/– क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## त्रिपुरी पौर्णिमेचे औचित्य साधून रामेश्वर महादेव मंदिरात दीपोत्सव साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**


त्रिपुरी पौर्णिमेचे औचित्य साधून पनवेल नगरीतील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या रामेश्वर महादेव मंदिरात दि.७ रोजी सोमवारी दीपोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी संपूर्ण परिसर दीपोत्सवाने उजळून निघाला.

कार्तिक पौर्णिमेला त्रिपुरारी पौर्णिमा किंवा त्रिपुरी पौर्णिमा असेही म्हटले जाते, या दिवशी शिवमंदिरात त्रिपुरी वात अर्थात दिव्यांची वात लावली जाते, हा तुळशी विवाहाचा शेवटचा दिवस मानला जातो, हिंदु धर्मात अनन्य साधारण महत्त्व असलेली कार्तिक पौर्णिमा आहे या दिवशी गंगेत स्नान करण्याने मोठे पुण्य मिळते अशी भावना आहे.

आजच्या दिवशी अनेक ठिकाणी दिपोत्सवही साजरा केला जातो. या दिवशी भगवान शंकराने अखंड भूमीवरून जनतेला त्रास देर्णाय़ा त्रिपुर राक्षसाचे तीन पुत्रांचा वध केला म्हणून या पौर्णिमेला त्रिपुरी किंवा त्रिपुरारी पौर्णिमा असे म्हणतात,

त्याचेच औचित्य साधून रामेश्वर महादेव मंदिरात भगवान शंकरापुढे आरती व त्रिपुर वात लावून उत्सव साजरा करण्यात आला, याचे आयोजन उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य तथा मंदिराचे अध्यक्ष उमेश इनामदार आणि जाणीव एक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष मा.नगरसेवक नितीन पाटील यांनी केले होते.

यावेळी भाजपा मा.नगरसेवक, सभागृह नेते परेश ठाकूर, शहर अध्यक्ष जयंत पगडे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सोशल मीडियाचे प्रसाद हनुमंते, पो.उपायुक्त शिवराज पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी धोटे, दिनेश बागुल, तसेच मंदिराचे विश्वस्त, कार्यकर्ते व भाविकगण उपस्थित होते.



मा.गुन्नाल सो. कोर्ट

अर्जदारातर्फे ॲड.
ॲड.अभिमन्यू हिंदुराव जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१५१७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२२/१२/२०२२

१) श्री.कमलाकर चंदर भोईर
वय : ५१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.४८१, उरण मार्ग, मु.कोल्ही,
पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
२) सौ.धर्मुबाई मुरलीधर करावकर
वय : ५३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.रुम नं.३८०, उरण मार्ग, मु.कोल्ही,
पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
३) श्रीमती.तारा यशवंत पाटील
वय : ५२, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.३०५ डी, लक्ष्मी नारायण मंदिराजवळ,
मु.कोल्ही, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
४) सौ.मंदा रंगीलाल कनौजिया
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.७८२, लक्ष्मी नारायण मंदिराजवळ,
मु.कोल्ही (कोपर), पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
५) श्रीमती.निराबाई मिन्नाथ पाटील
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै.चंदर तुकाराम भोईर यांचे निधन दि.२८/०१/२०२० रोजी कोल्ही येथे झाले आहे. १) श्री.कमलाकर चंदर भोईर, वय : ५१ वर्षे, रा.रुम नं.४८१, उरण मार्ग, मु.कोल्ही, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६, २) सौ.धर्मुबाई मुरलीधर करावकर वय : ५३ वर्षे, रा.रुम नं.३८०, उरण मार्ग, मु.कोल्ही, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ ३) श्रीमती.तारा यशवंत पाटील वय : ५२, धंदा : गृहिणी रा.रुम नं.३०५ डी, लक्ष्मी नारायण मंदिराजवळ, मु.कोल्ही, पो. पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ ४) श्रीमती.मंदा रंगीलाल कनौजिया वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी रा.रुम नं.७८२, लक्ष्मी नारायण मंदिराजवळ, मु.कोल्ही (कोपर), पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ ५) श्रीमती.निराबाई मिन्नाथ पाटील वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी रा.कुंडेवहाळ, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ यांनी या कोर्टात सदर मयत कै.चंदर तुकाराम भोईर यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**पनवेल तालुका हद्दीतील प्लॉट नं.१८१, सेक्टर नं.आर ३, पुष्पक वडघर, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६, क्षेत्र १७०.०० चौ.मी. अशा वर्णनाची मिळकत**

कै.चंदर तुकाराम भोईर यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०८/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांचा म्हसळा राष्ट्रवादी तर्फे जाहीर निषेध, राजीनाम्याची मागणी

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्या,संसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे यांच्या बाबत काळ केलेल्या शिवराळ वक्तव्याचा म्हसळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसने मोर्चा काढून जाहीर निषेध केला. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाचाळमंत्री सत्तार यांचा तातडीने राजीनामा घ्यावा अशा आशयाचे सह्यांचे निवेदन तालुका अध्यक्ष समीर बनकर यांचे नेतृत्वात काढलेल्या निषेध मोर्चातील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी म्हसळा नायब तहसीलदार तेलंगे यांच्याकडे देऊन मागणी केली आहे.

